नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १०/०३/२०२२**

---

## रामटेक येथील जुगार अड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड.........

दिनांक ०९/०३/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथक रामटेक उपविभागात गस्त करीत असतांना सदर पथकास गोपनीय बातमीदारा कडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, रामटेक येथील स्वामी विवेकानंद वार्ड येथे राहणारे प्रकाश मस्के यांचे राहते घराचे दुसरे माळयावरील हॉल मध्ये काही इसम हे ताशपत्यांवर पैशाची बाजी लावुन अवैधरित्या पैशाचा हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीती प्रमाणे सदर पथकाने सापळा रचुन पंचांसह रेड केला असता प्रकाश मस्के यांचे राहते घरात दुसरे माळयावरील हॉलमध्ये एकुण ७ जुगारी इसम हे ५२ ताशपत्यांवर पैशाची बाजी लावुन अवैधरित्या पैशाचा हारजीतचा जुगार खेळत रंगेहाथ मिळुन आले.

सदर प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने एकुण ७ जुगार खेळणारे इसम नामे सुनिल १) रामचंद्र कारेमोरे, रा. सालवा ता. मौदा, २) अकाडु श्रावण केळवदे, रा. स्वामी विवेकानंद वार्ड, रामटेक, ३) सचिन नौकलाल दमाये, रा. रामेश्वर वार्ड, रामटेक, ४) विनोद गोपीचंद लेंडे, रा. नगरधन, ५) वसिल हनीफ कुरेशी, रा. जाफर नगर, नागपुर, ६) प्रकाश दौलत मस्के, रा. स्वामी विनेकानंद वार्ड, रामटेक, ७) रवी गणपतराव पोकळे, रा.. भगतसिंग वार्ड, रामटेक यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन ५२ ताशपत्ते, नगदी १७,४००/–रू व ६ मोबाईल संच किं. ५१,०००/–रू असा एकुण ६८,४३०/–रू चा माल जप्त केला. सदर जुगारी इसमांना जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांचे विरूध्द अप.क्र. १४९/२०२२ कलम ४,५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला असुन पोलीस स्टेशन रामटेक हे पुढील तपास करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा., मा. उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब रामटेक राजेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनि राजीव कर्मलवार, पोहवा गजेंद्र चौधरी, पोना अमोल वाघ, रोहन डाखोरे, चापोहवा भाउराव खंडाते तसेच पोलीस ठाणे रामटेक येथील मपोउपनि सिमा बेंद्रे, पोशि शिवाजी दिंडे, अतुल बांते यांनी पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## चोरी करणा—या आरोपीतांवर गुन्हा दाखल

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** — अंतर्गत विक्तूबाबा देवस्थान टाकळघाट ०४ कि. मी. दक्षिण ०९/०३/२२ चे १३.३० वा दरम्यान, यातील फिर्यादी ही विक्तूबाबा देवस्थान टाकळघाट येथे जेवन करण्याकरीता भोजन कक्षासमोर लाईन मध्ये उभी असता, कोणीतरी अज्ञात महीला ने फिर्यादीच्या गळ्यातील दिड तोळ्याची सोन्याची चैन अंदाजे कि. ४०,०००/— रू. ची चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सौ. रमा अशोक मोडक वय ५० वर्ष रा. सिंदी मेंघे वार्ड न. ३ वर्धा यांचे रिपोर्टवरून येथे अज्ञात आरोपीविरूध्द पो स्टे एम आयडिसी बोरी येथे कलम ३७९ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास पो हवा इकबाल शेख मो.न. ८७८८३६८९०५ करीत आहेत.

## शारीरीक व मानसिक छळ करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पोलीस स्टेशन रामटेक** — अंतर्गत शांतीनाथ वार्ड जैन मंदिर रोड रामटेक १ किमी उत्तर, दिनांक २७/०३/२०१६ ते १५/०१/२०२२ चे १२:०० ते ००:३० वा पर्यत. यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे लग्न झाल्यापासुन, माहेरच्या लोकांकडुन फिर्यादीला नागपुरला घर घेवुन देण्याची वांरवार मागणी करून व तसेच फिर्यादीला मुलगी झाल्याच्या कारणावरून मानसिक व शारीरीक त्रास दिला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सादिया फारूक शेख वय ३१ वर्षे रा. शांतीनाथ वार्ड जैन मंदिर रोड रामटेक ह.मु. मौठा बाजार मौदा यांचे रिपोर्टवरून आरोपी नामे— **१) फारूख सुभान शेख २) सुभान अब्बास शेख ३) शकिलाबानु सुभान शेख** तीन्ही रा. शांतीनाथ वार्ड रामटेक यांचेविरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम कलम ४९८(अ), ३४ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास स.फौ सदाशिव काठे **हे** करीत आहेत.

## पाण्यात बुडुन मृत्यू

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** अंतर्गत मौजा भागेमाहेरी ०७ किमी पश्चिम. दि.०९/०३/२२ चे १४/०० वा. दरम्यान, यातील मृतक नामे— स्वप्नील सुनिल पाटील वय २३ वर्ष रा. लष्करी बाग बौदध मुर्ती जवळ नागपुर हा आपले परीवारासोबत पारशिवनी तालुक्याच्या भागेमाहेरी गावाच्या मागे असलेल्या तलावाजवळ वाढदिवस साजरा करण्याकरीता आला होता, सदर मृतक हा तलावाच्या पाण्यात आंघोळ करण्याकरीता गेला असता, तलावाच्या खोल पाण्यात बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोस्टे पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ प्रमाणे मर्ग दाखल करून तपासात आहे. पुढील तपास महीला पोलीस हवालदार संगिता कोवे पो.स्टे.पारशिवनी मो.क्र ९७६६०२४२५८ हे करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**